# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 09 October 2024
# Time 18.10 to 18.20
# Language Marathi
# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
# प्रादेशिक बातम्या
# दिनांक – ०९ ऑक्टोबर २०२४ सायंकाळी ६.१०

****

- देशाच्या प्रगतीला नेतृत्व देण्यात महाराष्ट्र अग्रेसर–पंतप्रधानांचं प्रतिपादन;जालना तसंच हिंगोलीसह राज्यात दहा वैद्यकीय महाविद्यालयांचं पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन
- सूक्ष्म पोषकतत्वयुक्त तांदुळाचा डिसेंबर २०२८ पर्यंत पुरवठा करण्याला केंद्र सरकारची मंजुरी
- विधानसभेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय घडामोडींना वेग

आणि

- नागपूर इथं दीक्षाभूमीवर उद्यापासून ६८ व्या धम्मप्रवर्तन दिन कार्यक्रमाला प्रारंभ

****

देशाच्या प्रगतीला नेतृत्व देण्यात महाराष्ट्र अग्रेसर असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. राज्यभरात सात हजार ६०० कोटी रुपयांच्या प्रकल्पांची पायाभरणी तसंच दहा वैद्यकीय महाविद्यालयांचं उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते आज दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून झालं, त्यावेळी ते बोलत होते. या प्रकल्पांची पायाभरणी म्हणजे समृद्ध आणि निरोगी महाराष्ट्राची पायाभरणी असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. ते म्हणाले –

***साथीयों पिछले दस वर्ष में हमने देश के विकास के लिये आधुनिक इन्फ्रा बनाने का एक महायज्ञ शुरू किया। आज हम सिर्फ बिल्डींग्स नही बना रहे है। हम एक स्वस्थ और समृद्ध महाराष्ट्र की नीव रख रहे है। एक साथ दस नये मेडिकल कॉलेजों की शुरूवात ये केवल दस***

***नये संस्थानों को तयार करना नही है। ये लाखो लोगों के जीवन को बेहतर बनाने का महायज्ञ है। आज महाराष्ट्र एक बार फिर देश की प्रगती को नेतृत्व देने को आगे बढ रहा है।***

राज्यात जालना आणि हिंगोलीसह मुंबई, नाशिक, बुलडाणा, वाशिम, अमरावती, भंडारा, गडचिरोली आणि अंबरनाथ याठिकाणच्या दहा वैद्यकीय महाविद्यालयांचं उद्घाटन झालं. या महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या जागा ९०० ने वाढणार असून, एकूण ३५ महाविद्यालयात प्रतिवर्ष चार हजार ८५० एमबीबीएस जागा उपलब्ध होणार आहेत.

नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळाचा अद्ययावतीकरण प्रकल्प आणि शिर्डी विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीची पायाभरणी पंतप्रधानांच्या हस्ते आज करण्यात आली. भारतीय कौशल्य संस्था आणि महाराष्ट्र विद्या समीक्षा केंद्राचं उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आलं.

या कार्यक्रमात राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन तसंच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले. नागपूर इथं या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

शिर्डी विमानतळ परिसरात झालेल्या कार्यक्रमात अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार आशुतोष काळे, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, शिर्डी विमानतळ संचालक गौरव उपश्याम आदी मान्यवर उपस्थित होते. शिर्डी विमानतळाचं नाव 'साईबाबा इंटरनॅशनल एअरपोर्ट' असं करण्यात आल्याची माहितीही विखे पाटील यांनी दिली.

****

हिंगोली इथल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी नऊशे शहाऐंशी पदांची निर्मिती करण्यात आली असून त्यानुसार पदभरती करण्यात येणार आहे. या नवनिर्मित वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉक्टर चक्रधर मुंगल यांनी ही माहिती दिली.

****

नागरिकांमध्ये आढळून येणारी रक्ताची आणि पोषक तत्वांची कमतरता दूर करण्यासाठी गरजू नागरिकांना फोर्टिफाईड अर्थात सूक्ष्म पोषकतत्वयुक्त तांदुळाचा पुरवठा डिसेंबर २०२८ पर्यंत सुरू ठेवण्यास करण्याला केंद्र सरकारनं मंजुरी दिली आहे. आज झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या योजनेसाठी सतरा हजार कोटी रुपयांहून जास्त निधी खर्च होणार असल्याचं केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं.
गुजरातच्या लोथलमध्ये राष्ट्रीय सागरी वारसा परिसर निर्माण करण्याला, तसंच, राजस्थान आणि पंजाबच्या सीमावर्ती भागांत चारशे कोटी रुपयांहून अधिक मूल्याचे दोन हजार दोनशे ऐंशी किलोमीटर्स लांबीचे रस्ते बांधण्यालाही आज केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली.

****

गेल्या दोन वर्षात आदिवासी बांधकाम विभागानं राज्यभरात तीन हजार सातशे पन्नास कोटी रुपयांच्या आश्रमशाळा तसंच वसतीगृहांच्या इमारती उभारल्या आहेत. आदिवासी विकास मंत्री डॉक्टर विजयकुमार गावीत यांनी ही माहिती दिली. आज नंदुरबार इथं दूरदृष्य प्रणालीद्वारे राज्यातल्या एकशे वीस आश्रमशाळा आणि वसतीगृहांच्या इमारतींचं लोकार्पण, भूमीपूजन आणि पायाभरणी कार्यक्रमात गावीत बोलत होते. अदिवासी खेळाडूंसाठी स्वतंत्र आश्रमशाळा उभारून त्यांना आवडीच्या खेळात प्रशिक्षण देणार असल्याचं गावीत यांनी सांगितलं.

****

वर्ष २०१९ च्या सरळ सेवा भरतीच्या अतिरिक्त यादीतल्या एकूण एक हजार अठ्ठावन्न उमेदवारांना एसटीच्या सेवेमध्ये चालक आणि वाहक या पदांवर सामावून घेतलं जाणार आहे. महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी ही माहिती दिली. याबाबत संबंधित उमेदवार आणि लोकप्रतिनिधींनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणीचं निवेदन दिलं होतं.

****

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या ४६ हजार विद्यार्थ्यांना विद्यावेतनाचा पहिला हप्ता मिळणार आहे. राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी आज मुंबईत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात विद्यावेतनाची रक्कम थेट जमा करण्यात येणार

असून, यासाठी राज्य सरकारकडून ४२ कोटी रुपये देण्यात येणार असल्याचं लोढा यांनी सांगितलं.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेनं सलग दहाव्या वेळी रेपो दर साडे सहा टक्के इतका कायम ठेवला आहे. नवी दिल्लीत बँकेच्या पतधोरण समितीच्या बैठकीनंतर गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत सकल घरगुती उत्पादनाचा वृद्धीदर सहा पूर्णांक सात टक्के इतका राहिल्याचंही बँकेच्या अहवालात म्हटलं आहे.

****

विधानसभेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय घडामोडींना वेग आला आहे.

मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करण्याची आम्हाला घाई नाही, महायुतीची सत्ता कायम राखणं, यावर आपला भर असल्याचं, उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी म्हटलं आहे. आज मुंबईत झालेल्या महायुतीच्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. महायुतीतल्या सगळ्या घटकपक्षांमध्ये बुथस्तरावर समन्वय राखण्यासाठी राज्यातल्या सगळ्या विधानसभा मतदारसंघांमध्ये समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली असून ही नावं यावेळी जाहीर करण्यात आली.

****

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी काँग्रेस पक्षाच्या चित्ररथाचं आज मुंबईत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलं. या रथाच्या माध्यमातून महायुती सरकारच्या कथित भ्रष्ट कामकाजाबाबत जनतेला माहिती देणार असल्याचं पटोले यांनी म्हटलं आहे.

****

राज्याच्या आगामी विधानसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीनं आज दहा जागांसाठी उमेदवार जाहीर केले. यात औरंगाबाद मध्य विधानसभा मतदारसंघासाठी मोहंमद जावीद मोहंमद इसहाक तर परभणी मतदारसंघासाठी सय्यद सामी सय्यद साहेबजान यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.

****

नागपूर इथं पवित्र दीक्षाभूमीवर दरवर्षीप्रमाणे यंदाही डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्यावतीने ६८ व्या धम्मप्रवर्तन दिन कार्यक्रमाला उद्यापासून प्रारंभ होत आहे. उद्या सकाळी स्मारक समितीचे अध्यक्ष भदन्त आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या उपस्थितीत भिक्खू संघ, उपासक तसंच श्रामणेर यांना दीक्षा देतील. धम्मदीक्षेचा हा कार्यक्रम सलग तीन दिवस चालणार आहे. ११ ऑक्टोबरला पंचशील ध्वजारोहण तर शनिवारी सायंकाळी धम्मप्रवर्तन दिनाचा मुख्य कार्यक्रम होणार आहे.

****

शारदीय नवरात्र महोत्सवात आज सातव्या माळेला श्री तुळजाभवानी देवीची शेषशायी अलंकार महापूजा मांडण्यात आली आहे. भगवान विष्णूंच्या कानातून निर्माण झालेल्या शुंभ-निशुंभ दैत्यांचा तुळजाभवानी मातेनं वध केला, या युद्धानंतर थकलेल्या देवीला विष्णूने आपली शेष शय्या विश्रांतीसाठी दिली, अशी आख्यायिका सांगितली जाते. त्या प्रसंगाचं स्मरण म्हणून ही पूजा मांडण्यात येते. दरम्यान, उद्या तुळजाभवानी देवीची भवानी तलवार अलंकार महापूजा आणि परवा महिषासुर मर्दिनी अलंकार महापूजा मांडण्यात येणार आहे.

****

धाराशिव इथं आज मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतल्या लाभार्थी महिलांचा मेळावा घेण्यात आला. यावेळी या योजनेसह मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण, यशस्वी उद्योजक महिला लाभार्थी, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती आणि महिला आर्थिक विकास महामंडळ या योजनांच्या प्रत्येकी पाच लाभार्थी महिलांचा, धाराशिवचे जिल्हाधिकारी डॉक्टर सचिन ओंबासे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

****